!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# पावसाळयात विद्युत पुरवठा सुरळीत ठेवा

## खासदार चंद्रकांत खैरे यांचे जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकीत निर्देश

**संभाजीनगर दि.२७**-विद्युत खांबांचा तुटवडा लक्षात घेऊन एक हजार विद्युत खांब उपलब्ध करुन देण्याचा ठराव जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकीत घेण्यात आला. तसेच शेतकऱ्यांचे विज कनेक्शन, नवीन मागणी असलेले रोहित्र तात्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी यंत्रणा उभारा व पावसाळयात विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही याची काळजी घेण्याचे निर्देश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिले.

बैठकीस आमदार संजय शिरसाठ, आमदार अतुल सावे, आमदार भाऊसाहेब चिकटगांवकर, मुख्य अभियंता गणेशकर, उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले, जिल्हा युवाधिकारी ऋषिकेश खैरे, खासदार राजकुमार धुत यांचे स्विय सहाय्यक, संजय सुर्वे, प्रशांत देसरडा, नगरसेवक मुंडे, शहर अभियंता सखाराम पानझडे, अधिक्षक अभियंता दिनेश अग्रवाल, अशोक फुलकर, कार्यकारी अभियंता पवन कछोट, ए पी पठाण, भुजंग खंदारे, राम काळे, प्रेमसिंग राजपूत, एन बी कुलकर्णी, आनंद तांदूळवाडीकर, हिरा सलामपुरे, बी व्ही जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती.

फॉल्टी मीटर, चुकीच्या मीटर रिडींग व उशीरा दिल्या जाणाऱ्या बिलांबद्दल आमदार अतुल सावे यांनी नाराजी व्यक्त करत एम एस ई बी च्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले. लोकप्रतिनिधींच्या पत्रांना प्रतिसाद दिला जात नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. आमदार संजय शिरसाट यांनी महावितरणकडुन विज ग्राहक व लोकप्रतिनिधींना दिली जाणारी उत्तरे ही वेळ काढु स्वरुपाची असतात. त्यामुळे उत्तरे देण्यात वेळ घालवण्यापेक्षा तक्रारी व समस्यांचा जलदगतीने निपटारा करा अशी सुचना केली. आमदार भाऊसाहेब चिकटगावकर यांनी वैजापूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या समस्या बैठकीत मांडल्या. महावितरण आपल्यादारी ही योजना नावापुरती उरली असून कुठलीही कामे होत नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिले. सातारा व देवळाई परीसरातील जिल्हा परीषद सदस्य योगिता रमेश बहुले व राजेंद्र राठोड यांनी निवेदनाव्दारे जीटीएलने उभे केलेल्या खांबांचे अपूर्ण काम महावितरणने पूर्ण करण्याची मागणी केली असल्याचे उपजिल्हाप्रमुख नंदकुमार घोडेले यांनी बैठकीत निदर्शनास आणून दिले.

जिल्हा युवा अधिकारी ऋषिकेश खैरे यांनी कन्नड, गंगापूर तालुक्यासंहित समर्थनगर परीसरातील वारंवार खंडीत होणाऱ्या विजपुरवठ्याचा मुद्दा बैठकीत उपस्थित केला. तसेच प्रशांत देसरडा यांनी अहिंसा नगर येथील अनेक दिवसांपासून डिपीची मागणी प्रलंबित असल्याचे सांगितले. यावर बैठकीत उपस्थित सदस्यांनी उपस्थित केलेल्या समस्या जलदगतीने सोडवा व शाळा, दवाखाने असलेल्या भागातील विजपुरवठा खंडीत होणार नाही शिवाय लो होल्टेजच्या समस्या उद्भवणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना खासदार चंद्रकांत खैरे यांनी बैठकीत दिल्या.

कन्नडसह सोयगांव, वैजापूर तालुक्यात एपीडीआरपी च्या योजनामध्ये महावितरणचे अभियंते अफरातफर करत असून नवीन कनेक्शन, नवीन डिपी, नवीन लाईन देण्यामध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा होत असल्याचे सुनिल सोनवणे यांनी निदर्शनास आणून दिले. शिवाय लेखी पुरावे पुढच्या जिल्हा विद्युतीकरण बैठकीत सादर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**प्रसिध्दी प्रमुख**

**फोटो मेल केला आहे.**

**योगेश पायघन / गणेश वाघ.**

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yogeshpayghan4329@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400